**परिपत्रक - ३९**

**रयत शिक्षण संस्था, सातारा**
आस्थापना माध्यमिक विभाग
**दिनांक - ०३/१०/२०१७**

सर्व शाखाप्रमुख,
प्राथमिक, माध्यमिक, माध्यमिक विद्यालयांशी संलग्नित सर्व उच्च माध्यमिक विद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये, रयत शिक्षण संस्था.

यांना....

**विषय :- साधना बालकुमार व युवा दिवाळी अंक : २०१७**

साधना साप्ताहिक पूज्य साने गुरुजी यांनी सुरु केले. गेली ७० वर्षे ते अखंडपणे प्रकाशित होत आहे. साने गुरुजींना मुलांचे विलक्षण अगत्य होते, त्यांनी उदात्त जीवनमूल्यांचा संस्कार बालकुमारांवर करण्याचे कार्य आयुष्यभर केले. त्यांच्या पश्चात हा वारसा साधना साप्ताहिक समर्थपणे चालवित आहे. १५ वर्षे डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी साधना संपादक म्हणून हा वारसा प्रज्वलित ठेवला. त्यानंतर साने गुरुजींची प्रेरणा व डॉ.दाभोलकरांचा मिळालेला प्रेरणादायी सहवास या बळावर साधना वर्धिष्णू करण्याची धडपड चालू आहे.

वाचनसंस्कृती वाढावी व मुल्यजाणीवांचा संस्कार व्हावा, या हेतूने महाराष्ट्रातील माध्यमिक / प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांपर्यंत मोठया प्रमाणात बालकुमार दिवाळी अंक पोहोचावीत अशी अपेक्षा आहे.

साधना बालकुमार दिवाळी अंक पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यासाठी ४४ पानांचा, संपूर्ण बहुरंगी, नामवंतांचे लेखन व उत्तम निर्मिती असा आहे. ३० रुपये किंमतीचा हा अंक 'ना नफा, ना तोटा' या तत्वावर फक्त १५ रुपयांत विद्यार्थ्यांना दिला जातो. तसेच अकरावीच्या पुढील युवांसाठी ६० पानांचा बहुरंगी अंक किंमत ४० रुपये असलेला सवलतीत २० रुपयांमध्ये दिला जातो. त्याला महाराष्ट्रातील विविध शाळा व विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळतो.

आपल्या शाळा/महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आपण सदर अंक विकत घेण्याचे आवाहन करावे. विद्यार्थ्यांवर सक्ती होऊ नये.

**अंक मागविण्यसाठी व संपर्कासाठी पत्ता व फोन नंबर**
साधना साप्ताहिक
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.
गोपाळ नेवे, प्रकल्प व्यवस्थापक, मो : ९४२१७०२८४१

सचिव,
**रयत शिक्षण संस्था, सातारा.**

**ता.क.**-१५ ऑक्टोबरला डॉ.अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरी केली जाणार आहे, त्यामुळे त्याचा उपयोग आपली शाळा/संस्था चांगल्या प्रकारे करु शकेल.
प्रत माहितीसाठी रवाना -
१) इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, मध्य विभाग, सातारा.
२) इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, दक्षिण विभाग, सांगली.
३) इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग, अहमदनगर.
४) इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, पश्चिम विभाग, पुणे.
५) इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, रायगड विभाग, कामोठे.(पनवेल)